।। सा विद्या या विमुक्तये ।।
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
"ज्ञानतीर्थ" परिसर, विष्णुपुरी, नांदेड - ४३१६०६ (महाराष्ट्र)
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY NANDED
"Dnyanteerth", Vishnupuri, Nanded - 431606 Maharashtra State (INDIA)
Established on 17th September 1994 – Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

Phone : (02462) 229294 **EXAMINATION DEPARTMENT** Website: srtmun.ac.in
Fax : (02462) 229572 e-mail:directorboee@srtmun.ac.in

संदर्भ: परीक्षा/कला/२०२०–२१/ ,  दि.२२/०६/२०२१

महत्वाचे परीपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य, सर्व संलग्नीत पदवी व व पदव्यूत्तर महाविद्यालये,
मा. प्राचार्य, मॉडेल कॉलेज, हिंगोली,
मा. संचालक, उपकेंद्र लातूर,
मा. संचालक, उपकेंद्र परभणी,
मा. समन्वयक, कै. श्री. उत्तमराव राठोड आदिवासी विकास व संशोधन केंद्र, किनवट.
मा. संचालक, सर्व विद्यापीठ संकुल,
प्रस्तूत विद्यापीठ.

**विषय – उन्हाळी –२०२१ प्रात्यक्षिक परीक्षा, अंतर्गत व SEC परीक्षेचे गुण सादर करणे बाबत...**

संदर्भ : ०१. परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र.परीक्षा/२०१९–२०/२० दि.१९/०५/२०२०
०२. परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र.परीक्षा/२०२०–२१/१०४ दि.२६/०६/२०२०
०३. परीक्षा विभागाचे परिपत्रक क्र.परीक्षा/२०२०–२१/१०८ दि.२९/०६/२०२०

महोदय,

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, उन्हाळी २०२१ पदवी व पदव्यूत्तर सर्व अभ्यासक्रमाचे परीक्षेची तारीख व वेळापत्रक निश्चित करण्यात आलेले आहे. उन्हाळी २०२१ ची सर्व अभ्यासक्रमाच्या प्रात्यक्षिक परीक्षा कोवीड १९ मुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे यूजीसीने व शासनाने दिलेल्या सूचनेप्रमाणे व परीक्षा विभागाचे उपरोक्त संदर्भ क्रमांक ०१,०२ व ०३ प्रमाणे उन्हाळी–२०२१ च्या सर्व प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात याव्यात.

उन्हाळी २०२१ परीक्षेच्या सर्वच पदवी व पदव्यूत्तर अभ्यासक्रमांच्या प्रात्यक्षिक परीक्षेचे नियोजन लेखी परीक्षेपूर्वी करावयाचे आहे. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी लागणारी नेमलिस्ट दि. ७ जूलै २०२१ नंतर विद्यापीठ संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल. त्यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक लेखी परीक्षेपूर्वी संपेल असे नियोजन करून प्रात्यक्षिक परीक्षेचे आयोजन करावे. प्रात्यक्षिक परीक्षेचे गुण ऑनलाईन सादर करावयाचे असून त्यासाठी स्वंतत्र अभ्यासक्रम निहाय लिंक परीक्षा विभागामार्फत उपलब्ध करून देण्यात येईल. उन्हाळी – २०२१परीक्षेकरिता थेअरी व **SEC** परीक्षेचे अंतर्गत गुण लेखी परीक्षेची नावाची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्राप्त झाल्यानंतर ऑनलाईन पध्दतीने सादर करावे व या सर्वांची प्रिंटआऊटची एक प्रत प्राचार्यांच्या स्वाक्षरी व शिक्कयासह परीक्षा विभागात सादर करावी.

उपरोक्त बाब विद्यार्थी, प्राध्यापक व इतर सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणुन दयावी, ही विनंती.

प्र. संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ